॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव Formerly North Maharashtra University, Jalgaon )
1990
'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

## परीक्षा (विज्ञान व शिक्षण शास्त्र) विभाग

जा. क्र. कबचौ उमवि/७-क / १४११ /२०२१ दि. २८/६/२०२१

प्रति,
मा. प्राचार्य / प्राचार्या,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित
**सर्व विज्ञान महाविद्यालये यांना --**

**विषय -** अध्यादेश ६७ नुसार संधी संपलेल्या विद्यार्थ्यांना माहे, जून २०२१ च्या परीक्षेसाठी खास बाब म्हणून अतिरीक्त संधी बाबत **(तिसरा टप्पा)** --
**(संधी संपलेल्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन प्राप्त झालेले परीक्षा अर्ज )**

**संदर्भ -** **१.** विद्यापीठाचे पत्र जा.क्र. कबचौ उमवि/ ७-क/ १२८३/२०२१, दि. १२/६/२०२१ (पहीला टप्पा)
**२.** विद्यापीठाचे पत्र जा.क्र. कबचौ उमवि/ ७-क/ १३५५/२०२१, दि. २२/६/२०२१ (दुसरा टप्पा)

**महोदय / महोदया,**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना कला, वाणिज्य व विज्ञान अभ्यासक्रमाची पदवी उत्तिर्ण होणे करीता अध्यादेश ६७ मध्ये नमुद केलेला कालावधी पाहाता, ज्या विद्यार्थ्यांचा सदर कालावधी संपलेला आहे , अशा विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी अतिरीक्त संधी मिळणे करीता महाविद्यालया मार्फत विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक असतात. सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने अध्यादेश ६७ नुसार अतिरीक्त संधी मंजुर करण्याचे अधिकार मा. कुलगुरु महोदयांना आहेत.

**२.** त्या अनुषंगाने माहे, जून २०२१ मध्ये होणाऱ्या विज्ञान पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी खास बाब म्हणून मा. कुलगुरु महोदयांनी अतिरीक्त संधी मंजुर केलेल्या विद्यार्थ्यांची यादी वरील संदर्भिय क्र. १ व २ च्या अनुषंगाने विद्यापीठाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. वरील **संदर्भिय क्र १ व २ च्या यादीतील ज्या विद्यार्थ्यांचे संधीचे अतिरीक्त शुल्क विद्यापीठाकडे अद्याप जमा करावयाचे बाकी आहेत, त्यांच्या शुल्काची रक्कम विद्यापीठाकडे तातडीने जमा करण्यात यावी.**

**३.** तसेच, विद्यापीठाचे वरील संदर्भिय क्र. १ चे पत्र निर्गमीत झाल्यानंतरच्या पुढील कालावधीत विद्यापीठाकडे ऑनलाईन प्राप्त झालेल्या परीक्षा अर्जांची छाननी केली असता असे निदर्शनास आले आहे की, अध्यादेश ६७ नुसार ज्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या संधी संपलेल्या आहेत अशा विज्ञान शाखेच्या ०२ विद्यार्थ्यांचे जून २०२१ मध्ये होणाऱ्या परीक्षेकरीता परीक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने प्राप्त झालेले आहेत. सदर विद्यार्थ्यांना मा. कुलगुरु महोदयांकडून परीक्षेसाठी अतिरीक्त संधी मंजुर नसतांना त्यांचे परीक्षा अर्ज सादर होणे ही बाब नियमास अनुसरुन नाही.

**४.** अतिरीक्त संधी मंजुर नसतांना सदर विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज ऑन लाईन भरल्यामुळे संगणकीय ऑनलाईन प्रणालीव्दारे त्यांची परीक्षा प्रवेश पत्रे देखील निर्गमीत झालेली आहेत.

**५.** अशा विद्यार्थ्यांसंदर्भातील बाब मा. कुलगुरु महोदयांना सादर करण्यात आली असता, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हीत लक्षात घेता, अशा विद्यार्थ्यांना मा. कुलगुरु महोदयांनी अध्यादेश ६७ मधील तरतुदीनुसार खास बाब म्हणून माहे, जून २०२१ च्या परीक्षेसाठी एक अतिरीक्त संधी मान्य केलेली आहे.

**६.** त्या अनुषंगाने, खालील यादीत नमुद केलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षेस प्रविष्ट झालेले विषय आपल्याकडील दस्तऐवजांवरुन तपासून, संधीचे अतिरीक्त शुल्क प्रती विषय रु. ५००/- (एकच विषय असल्यास किमान रु. १०००/-) या प्रमाणे होणाऱ्या **शुल्काची रक्कम दि. ०५/०७/२०२१ पुर्वी विद्यापीठात जमा करावी.** ज्या विद्यार्थ्यांची संधीच्या अतिरीक्त शुल्काची रक्कम विहित मुदतीत जमा होणार नाही असे विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले तरी त्यांचे निकाल जाहीर केले जाणार नाहीत याची नोंद घेऊन सदर बाब विद्यार्थ्यांच्या निर्दशनास आणून द्यावी ही विनंती.

| Sr. No. | Course | PRN | Name of Student | College Code |
|---|---|---|---|---|
| 1 | TY B.Sc. Sem. V | 2008015400149463 | Patil Rajanesh Waman | 200073 |
| 2 | TY B.Sc. Sem. VI | 2008015400149463 | Patil Rajanesh Waman | 200073 |
| 3 | SY B.Sc. Sem. III | 2011015400089695 | Patil Kamalkishor Ravindra | 190041 |
| 4 | TY B.Sc. Sem. V | 2011015400089695 | Patil Kamalkishor Ravindra | 190041 |

**७.** वरील विद्यार्थ्यांची अतिरीक्त शुल्काची रक्कम महाविद्यालयाच्या बँक खात्यामध्ये ऑनलाईन स्वरुपात भरणेबाबत विद्यार्थ्यांना सुचीत करावे. त्यासाठी महाविद्यालयाच्या बँकेचे नाव, शाखा, गाव, खाते क्रमांक, आय.एफ.एस.सी. कोड इत्यादी बाबी विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन द्याव्यात. जेणेकरुन विद्यार्थी महाविद्यालयास ऑनलाईन पेमेंट करु शकतील.

**८.** महाविद्यालयाकडे उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले अतिरिक्त परीक्षा शुल्क महाविद्यालयाने एकत्रितरित्या विद्यापीठाच्या खालील नमूद केलेल्या Bank Account मध्ये ऑनलाईन स्वरूपात भरावेत, ही विनंती.

| Name of the Bank | Branch Name and Code | Account No. | IFSC Code |
|---|---|---|---|
| Central Bank of India | NMU 284435 | 3184541255 | CBIN0284435 |

**९.** विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या अतिरीक्त शुल्काची खालील प्रमाणे माहिती व अतिरीक्त परीक्षा शुल्क विद्यापीठाच्या बँक खाती जमा केल्याची पावती परीक्षा विज्ञान विद्याशाखेच्या ईमेलवर **पीडीएफ स्वरूपातच** पाठवावी ही विनंती.

| **अ.क्र.** | **महाविद्यालयाचे नाव** | **विद्यार्थ्यांचे नाव व यादीतील क्रमांक** | **पीआरएन नंबर.** | **वर्ग** | **परीक्षेस बसलेल्या समकक्ष / विषयांची नावे** | **समकक्ष / विषय कोड** | **एकूण भरलेले अतिरिक्त शुल्क** | **परीक्षा शुल्क पावतीचा तपशिल** | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | | | | | |
| २. | | | | | | | | | |

**कृपया, उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करुन विद्यापीठास सहकार्य करावे ही विनंती.**

आपला विश्वासू,

Sd/-
(के. छ. पाटील)
सहा. कुलसचिव,
परीक्षा (विज्ञान व शिक्षण शास्त्र) विभाग